नमस्कार,

महाराष्ट्र राज्यातील सहकार क्षेत्रात काम करणा–या सर्व प्रमाणीत लेखापरीक्षकांच्या सोयीसाठी आपण ही वेबसाईट सुरू करीत आहोत.

सहकारी कायदयात सन १९६२–६३ पासुन प्रमाणीत लेखापरीक्षक ही संकल्पना समाविष्ट आहे. परंतु या आपल्या लेखापरीक्षक सहका–यांसाठी पुर्ण क्षमतेने झोकुन देउन काम करणारी संघटना राज्यात कार्यरत नव्हती. लेखापरीक्षकांचे अनेक प्रश्न सरकार दरबारी मांडणेसाठी योग्य व अचुक अशी यंत्रणा कार्यरत नव्हती. लेखापरीक्षकांच्या योग्य मागण्या योग्य त्या प्रकारे शासनापर्यंत पोहोचत नव्हत्या. लेखापरीक्षकांचे प्रभावी राज्यव्यापी संघटन झालेले नव्हते. यातच कोव्हिड २०१९ ची सुरूवात झाली. अध्यक्ष रामदास शिर्के व सर्व सहका–यांच्या संकल्पनेतुन यावेळी सर्वांनी संपर्कात राहणे व आपल्या ज्ञानात भर पडावी या उददेशाने ऑनलाईन वेबिनार घेणेस सुरूवात केली. यातुनच आपले लेखापरीक्षक एकत्र येउन **ऑडिटर कौन्सिल अॅण्ड वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य, पुणे** या संघटनेची मुहुर्तमेढ रोवली गेली. राज्याच्या विविध भागातुन आपल्या लेखापरीक्षण कार्याचा ठसा उमटविणारे व नेतृत्व करण्यास पात्र असे सक्षम लेखापरीक्षक या संघटनेचे विश्वस्त झाले. दिनांक ११.०९.२०२० रोजी आपण आपल्या या राज्य कार्यक्षेत्र असणा–या संघटनेची नोंदणी केली. **योग्य मार्गदर्शन व गुणवत्तापुर्ण लेखापरीक्षण हेच ऑडिटर कौन्सिलचे मिशन** आहे.

## संस्थेचे उददेश :–

१. राज्याच्या विविध भागांत कार्यरत असणा–या लेखापरीक्षकांना संघटनेचे सभासद करून एकाच छताखाली आणणे व आपली संघटन शक्ती वाढविणे.
२. प्रमाणीत लेखापरीक्षकांना भेडसावणारे विविध प्रश्न शासन दरबारी मांडणे व त्याची सोडवणुक करणेसाठी प्रयत्न करणे.
३. शिक्षित असणा–या आपल्या लेखापरीक्षकांना प्रशिक्षण देणेची व्यवस्था करून त्यांना विविध प्रकारच्या लेखापरीक्षण कामासाठी सक्षम करणे.
४. ऑडीटर कौन्सिल या आपल्या संघटनेची शासनदरबारी मान्यता प्राप्त संस्था म्हणुन नोंदणी करणे.
५. सहकार खात्याकडुन आपल्या प्रश्नांची योग्य प्रकारे सोडवणुक होत नसल्यास कायदेशीर मार्गांचा अवलंब करून प्रश्नांची सोडवणुक करणेचा प्रयत्न करणे.
६. वार्षिक अधिवेशन घेउन आपल्या रास्त मागण्या शासनाकडुन मान्य करून घेणे.

## संस्थेने आतापर्यंत केलेले यशस्वी कार्य :–

– कोविड काळात अडचणी निर्माण झाल्याने व पुढे वापरासाठी लेखापरीक्षकांना ओळखपत्र मिळवुन दिले.
– आतापर्यंत ६१ वेबिनार घेउन लेखापरीक्षकांना प्रशिक्षित केले. यामध्ये प्रामुख्याने सहनिबंधक मा. तानाजी कवडे यांचेसह अनेक सहकारी अधिकारी तसेच सहकार क्षेत्रातील अनेक उच्चविदयाविभुषित मान्यवरांचे विचार लेखापरीक्षकांपर्यंत विनामुल्य पोहचविले आहेत.

— वर्षपुर्तीच्या कार्यक्रमास सहकार मंत्री मा. ना. बाळासाहेब पाटील तसेच सहकार आयुक्त मा. अनिल कवडे यांनीही उपस्थित राहुन शुभेच्छांसह देउन मार्गदर्शन केले.
— सर्व सभासदांना आपल्या वेल्फेअर या उददेशानुसार पाच लाखांचा अपघाती विमा मोफत दिला आहे.
— सहकार खात्याच्या कायदा दुरूस्ती समितीमध्ये कौन्सिलला प्रतिनिधीत्व मिळाल्यानुसार सहकारी क्षेत्रातील विविध प्रश्न सहकार आयुक्त व शासन दरबारी मांडले.
— ९७ वी घटनादुरूस्ती रदद झाल्यानंतर सहकार आयुक्त यांचेसह मा. सहकार मंत्री याचबरोबरच मा. शदरचद्र पवार या मान्यवरांना भेटुन व आवश्यक तो पत्रव्यवहार करून संस्थांची स्वायत्तता कायम राहणेसाठी प्रयत्न केले.
— व्यवहारांतील पारदर्शकता लक्षात घेउन संस्थेचे सर्व व्यवहार सुरूवातीपासुनच बॅकट्रान्स्फरने करीत आहोत.
— राज्याच्या विविध ९ विभागातुन संस्थेचे सभासद झाले असुन नुकतेच यापैकी बहुतांश जिल्हयात कौन्सिलने प्रत्यक्ष भेटी देउन लेखापरीक्षकांच्या अडीअडचणी समजुन घेतल्या व त्या सोडविण्यासाठी सहकार खात्याकडे पत्रव्यवहार केला आहे.
— मार्च २०२२ मध्ये राज्याच्या विविध जिल्हयातुन दौरे करून लेखापरीक्षक बांधवांच्या भेटी घेतल्या, त्यांच्या अडीअडचणींवर चर्चा करून त्या मांडण्यासाठी कौन्सिलचे राज्यस्तरीय अधिवेशन हे व्यासपीठ निर्माण केले.

यापकारे काम करीत असताना आम्ही सहकार क्षेत्रातील सर्वच प्रमाणीत लेखापरीक्षक, धर्मादाय संस्थाचे अधिकृत लेखापरीक्षक तसेच जी डी सी ए परीक्षा पास झालेले व या कार्यात येण्यास उत्सुक असणा—यांना खुले सभासदत्व देत आहोत.

राज्यातील सर्व प्रमाणीत लेखापरीक्षकांना व होउ लेखापरीक्षक इच्छिणा—या सर्वांना आम्ही असे आवाहन करीत आहोत कि वेबसाईटवर उपलब्ध नोंदणी फॉर्म भरून आपणही कौन्सिलचे सभासदत्व स्वीकारावे. आम्हांस साथ दयावी, व सहकाराच्या या ज्ञानयज्ञात आपण मन:पुर्वक सहभागी व्हावे.

आपले विश्वासू व मित्र,
सर्व विश्वस्त व सदस्य
ऑडीटर्स कौन्सिल ॲण्ड वेल्फेअर असोसिएशन